# जिल्हा परिषद विद्या मंदिर फार्म, हाता ता. बाळापुर व निंबी (मालोकार) ता. अकोला येथील शेतजमीन

विद्या मंदिर फार्म हाता ता. बाळापुर येथील गट क्र. २४० पू (४५ एकर), गट क्र. २४० पश्चिम (३० एकर ), गट क्र. ५६७ (४० एकर), गट क्र. ७६५ (४० एकर) या गटातील शेती १५५ एकर व निंबी (मा) येथील गट क्र. ५४ मधील ३५ एकर असे एकूण १९० एकर शेतजमीन मध्ये उत्पन्न घेण्यात येते. सन २०२५-२६ या वर्षाकरिता दिनांक ०१/०५/२०२५ ते ३१/०३/२०२६ पर्यंत वाहितीसाठी भाडेपट्टीवर द्यावयाचे आहे. त्या करिता मौजे हाता ता. बाळापुर येथील लिलाव दिनांक २८/०४/२०२५ ला सकाळी ११.०० वाजता जि. प. शाळा हाता व निंबी (मा) ता. जि. अकोला दिनांक २९/०४/२०२५ ला ग्राम पंचायत कार्यालय येथे सकाळी ११.०० वाजता मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाचे पालन करून जाहीर लिलाव घेण्यात येईल. जाहीर लिलावामध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी खालील अटी व शर्ती मान्य असल्यास लिलावाच्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व वेळेवर उपस्थित राहावे.

## जाहीर लिलाव अट व शर्ती

१.लिलावात भाग घेण्यापूर्वी शेतकऱ्यांस लिलाव अधिकारी यांचे जवळ अनामत रक्कम रु. २०,०००/- रोखीने भरावी लागेल. अंतिम बोली बोलणारा शेतकरी वगळून जमा झालेली रक्कम लिलावाच्या ठिकाणी शेतकर्यांना रोखीने परत करण्यात येईल.

२.अंतिम बोली बोलणार्यास ताबडतोब रु: ३०,०००/- रोखीने जमा करावी लागेल आणि उर्वरित बोलीची संपूर्ण रक्कम लिलाव दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत कृषि विभाग जि. प. अकोला येथे धनाकर्षाद्वारे (डीडी)/आर.टी.जि.एस. द्वारे कृषि विकास अधिकारी जि. प. अकोला यांचे नावे भरावी लागेल. विहित मुदतीत उर्वरित रक्कम न भरल्यास जमा केलेली रक्कम रु. ५०,०००/- जप्त करण्यात येईल.

३.जमीन वाहितीसाठी घेणाऱ्या शेतकऱ्यास रु. ५०० /- च्या स्टम्पपेपरवर कृषि विकास अधिकारी, अकोला यांचेशी विहित करारनामा लिहून द्यावा लागेल.

४.लिलावामध्ये शेती घेणार्यास विद्या मंदिर फार्म वरील कोणतीही सुविधा जिल्हा परिषद, अकोला कडून मिळणार नाही. उदा. जागा, गोडवून, बैलगाडी, पीकविमा, शेतीविषयक साहित्य इत्यादी.

५.शेतावरील झाडे माती बांध, इत्यादी वर लिलावात जमीन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा हक्क राहणार नाही.

६.लिलावात योग्य रक्कम प्राप्त न झाल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी जि. प. अकोला यांना राहील.

७.नैसर्गिक आपत्तीमुळे, गैरकायदेशीर अतिक्रमण, न्यायालयीन प्रकरणामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव झालेल्या नुकसानीस जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही, लिलावात जमीन घेतलेल्या बाबत फक्त प्रमाणपत्र देण्यात येईल.

८.या लिलावाद्वारे वाहितीस प्राप्त झालेल्या शेतीमुळे जमीन महसूल अधिनियम १९६६ तसेच या संदर्भातील इतर कुठल्याही कायद्याचे, नियमाचे, अधिनियमाचे उल्लंघन होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारक शेतकऱ्याने घेणे बंधनकारक राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, अकोला